## नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १६५/२०१२ मधील नि.क्र. १०३ खालील आदेश सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय.०६—०००४५३—२०१२

१. वादीने या अर्जाद्वारे सावंतवाडी नगरपरिषद येथील स्थायी समिती व बांधकाम समिती यांचेकडून त्यांच्या सभेचा इतिवृत्त नोंदवहया सादर करणेबाबत कार्यालय अधिक्षक, सावंतवाडी नगरपरिषद यांना साक्षी समन्स होणेची मागणी केली आहे. त्याचे असे कथन आहे की, सावंतवाडी नगर परिषदेने दावा इमल्याच्या संदर्भात त्यांच्या दप्तरी खोटी व खोडसाळ नोंद केलेली आहे. त्याबाबतचे आवश्यक ते ठराव त्यांचे दप्तरी मिळून येत नाहीत असे त्यांनी यापूर्वी पाठविलेल्या साक्षी समन्सला खोडसाळपणे उत्तर दिलेले आहे. हा दावा या नगरपरिषदेने केलेल्या खोटया व खोडसाळ नोंदीवर विसंबून असून दावा इमल्याची कर निर्धारण नोंदवहीमध्ये मालक भोगवटादार सदरी वादीचे नाव वगळून केवळ प्रतिवादीचे नावाची नोंद बेकायदेशीररित्या नगरपरिषदेने केली आहे. सबब प्रतिवादीने या दोन्ही समित्यांच्या सभांचे इतिवृत्त नोंदवहयांची मागणी साक्षी समन्स द्वारे केली आहे.

२. प्रतिवादीने नि. १०४ अन्वये वादीचे अर्जाला म्हणणे देवून आक्षेप घेतलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जातील मागणी केलेल्या नोंदवहींची कोणतीही तारीख, महिना व वर्ष यांचा उल्लेख नाही आणि वादीने कोणतीही मागणी स्पष्टपणे केलेली नाही. यापूर्वी नि. ९५ व नि. १०१ कडे अशा स्वरुपाचा वादीने अर्ज दिलेला आहे आणि त्यानुसार सावंतवाडी नगरपरिषदेने त्यांचा अहवाल सादर करुन त्यांच्याकडे कोणतेही कागद नाहीत असे कळविले आहे. त्यामुळे अशा स्वरुपाचा अर्ज देवून वादी न्यायालयाचा वेळ घेत आहे. यापूर्वी हा दावा अंतिम युक्तीवादासाठी ठेवला

असताना वादी वेगवेगळे अर्ज देवून नाहक विलंब करत आहे असे कथन करुन अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

०३. वादी व प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

०४. दाव्याच्या अभिलेखाचे मी अवलोकन केले आहे. वादीने हा दावा सर्व्हे क्रमांक ११०, हिस्सा क्रमांक १२ ही मिळकत प्रतिवादी क्र. २ या देवस्थानच्या मालकीच्या असून त्यावर प्रतिवादी क्र. ३ या समितीचे नियंत्रण आहे असे नमुद करुन या मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ यांचे वडील महादेव भीम गिरी यांचे मालकीचा इमला क्र.बी/२१८ अ ही जुनी कौलारु व मातीची भिंत असलेला इमला असून त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचा प्रत्येकी १/२ हिस्सा असल्याने या हिश्याचे सरसनिरस मानाने धडेवाटप होवून मिळणेची मागणी केलेली आहे. वादीचे असे देखील कथन आहे की, त्यांचे वडिलांनी दिनांक २८/०६/१९९३ रोजी नोंदणीकृत बक्षीसपत्राने वादी व प्रतिवादी यांस हा इमला बक्षीसपत्राने दिला. प्रतिवादी क्र. १ ने सावंतवाडी नगरपरिषदेसोबत हात मिळवणी करुन त्यांच्या संमत्ती शिवाय त्यांची फसवणूक करुन नगरपरिषद दप्तरी कर निर्धारण रजिस्टरवरुन वादीचे नाव अनधिकृतपणे व बेकायदेशीरपणे कमी करुन घेतले. या ठरावाची सत्य प्रत मागणी करुन वादीने नि. ९५ वर अर्ज देवून नगर परिषदेला साक्षी समन्स होणेचा अर्ज दिला आहे. त्याप्रमाणे सदर नगरपरिषदेने असा ठराव त्यांच्याकडे अढळ होत नाही असे कळविले होते. त्यानंतर पुन्हा वादीने नि. १०१ वर या ठरावाची सत्य प्रत दाखल होणेकरीता साक्षी समन्सचा अर्ज दिला आहे. हा अर्ज माझे पूर्व पीठासन अधिकारी यांनी चौकशी अंती नामंजूर केला आहे. त्यानंतर या अर्जाद्वारे वादी नगरपरिषदेकडील स्थायी समिती व बांधकाम समितीच्या सभेचे इतिवृत्त नोंदवहयांची मागणी करत आहेत. सदर मागणी केलेल्या कागदपत्रांचे स्वरुप पहाता त्या सर्व नोंदवहया या दाव्यातील उभय पक्षकारांमधील वाद मुद्यांशी संबंधीत आहेत असे

मला वाटत नाही. याशिवाय वादीने नेमक्या कोणत्या कालावधीमधील अथवा विशिष्ट तारखेचा, दिवस वा महिनेची नोंदवही आवश्यक आहे याचा खुलासा अर्जामध्ये केलेला नाही. सदरची नोंदवहयांची मागणी पूर्णपणे संदिग्ध आहे. या कारणास्तव वादीने केलेली मागणी कायदयाने मंजूर करता येणार नाही. या सर्व विवेचनास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**—: :— आदेश —: :—**

१. वादीचा नि. १०३ वरील अर्ज नामंजूर करणेत येतो.

स्वाक्षरीत/—
(श्रीमती आर.आर.बेडगकर)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.

दिनांक: ०६.०७.२०१९